RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४] गुरुवार, जानेवारी १२, २०२३/ पौष २२, शके १९४४ [पृष्ठे ४ किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप विभागीय अधिकारी, पालघर उप विभाग, पालघर, यांजकडून

**मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ११(१) ची**

**अधिसूचना**

क्रमांक पीडी/भू.सं./हायस्पीड रेल/कावि-३३/२०२३.— भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामधील कलम ३ चा खंड (इ) च्या द्वारे परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र. क्र.७७/अ-२/ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाचा कलम ३ खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा अधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे). सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ चा पोट-कलम ४अ नुसार कार्यवाही पूर्ण होईल. त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-नियम (५) नुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम १४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावती करण्याचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील, जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पालघर उप विभाग, पालघर यांस पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूची-एक

(१) गाव-बेटेगाव, तालुका–पालघर, जिल्हा-पालघर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | १३९ | ०.०४६४ |
| २ | १३० | ०.०१३० |
| ३ | १२३ | ०.१४३३ |
| | **एकूण** | **०.२०२७** |

(२) गाव पडघे, तालुका पालघर, जिल्हा पालघर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | ६१६ | ०.१७७१ |
| २ | ५७० | ०.०११९ |
| | **एकूण** | **०.१८९०** |

(३) गाव मान, तालुका पालघर, जिल्हा पालघर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | रोड | ०.००६२ |
| २ | १५४ | ०.०२२२ |
| ३ | १४८ | ०.०३९२ |
| ४ | १४९ | ०.०४६६ |
| ५ | १५० | ०.०४७१ |
| ६ | १५५ | ०.००९३ |
| | **एकूण** | **१७०६** |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजन स्वरूपाचे विवरण

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचे नाव :** | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प |
| **प्रकल्पाचे वर्णन :** | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्प हा एकूण ५०८.१० कि.मी. चा प्रकल्प आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील एकूण १५५.७६ कि.मी. व केंद्रशासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली मध्ये-४.३० कि.मी. व गुजरातमध्ये - ३४८.०४ कि.मी. आहे. |
| **समाजाला मिळणारे लाभ :** | मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पामुळे जलदगती रेल्वे प्रकल्प बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे याकामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगारच्या संधी मिळतील.<br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुकीत वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकष विकास, मोठ्याप्रमाणात रोजगार निर्मिती, पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

१. प्रकल्पाचे बांधकाम

२. प्रकल्पाचे परिचालन

३. प्रकल्पाची देखभाल.

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता.

## अनुसूची-चार

## सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश

शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. संकीर्ण ०१/२०१५ प्र.क्र.३/अ-२, दिनांक १३ मार्च २०१५ द्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १० समाविष्ट केले असून, त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक १२९, दिनांक ३० मे २०१९ नुसार उक्त फरक प्रकल्पाला जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणाने, प्रकरण दोन आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची-पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), पालघर |
| ब. | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, रूम नं. ११४, पहिला मजला, कोळगांव, बोईसर रोड, पालघर, ता. व जि. पालघर पिन कोड ४०१ ४०४ |
| क. | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील. | **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार-ब, वर्ष ५, अंक ९२(२) गुरुवार, जुलै ११, २०१९/आषाढ २०, शके १९४१, महसूल व वन विभाग, अधिसूचना दिनांक ९ जुलै २०१९ अन्वये उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. |

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यक्यता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे ११ चे उप कलम (१) खाली अधिसूचीत करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप विभागीय अधिकारी भूसंपादन अधिकारी पालघर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविण्यात येईल.

पालघर,
दिनांक १२ जानेवारी २०२३.

**धनाजी तोरस्कर,**
उप विभागीय अधिकारी,
पालघर उप विभाग, पालघर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.